सन २०१९-२० मधील अर्थसंकल्पित
तरतुदींचे वितरण करणेबाबत.
छत्रपती शिवाजी महाराज शेतकरी सन्मान
योजना (राज्यस्तर) (२४३५ ००८२).

**महाराष्ट्र शासन**
**सहकार पणन व वस्त्रोद्योग विभाग**
**शासन निर्णय क्र. कृकमा ०५१९/प्र.क्र.७७/२-स**
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२
दिनांक : ३० जुलै, २०१९

वाचा :-

१) सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग शासन निर्णय क्रमांक कृकमा ०६१७ / प्र.क्र.१२७/२-स दि. २८.६.२०१७, दि. ८.९.२०१७, दि.७.१२.२०१७, दि.२८.२.२०१८, दि.३१.३.२०१८, दि.१६.४.२०१८ व दि.२.५.२०१८
२) सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग शासन शुद्धीपत्र क्रमांक कृकमा ०६१७ / प्र.क्र.१२७/ २-स दि. ५.७.२०१७, दि.२०.७.२०१७ व दि.१२.१२.२०१७
३) सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग शासन निर्णय क्रमांक कृकमा ०४१८ / प्र.क्र.५३/२-स दि. ९.५.२०१८ व दि.५.६.२०१८
४) सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग शासन परिपत्रक क्रमांक कृकमा ०४१८ / प्र.क्र.५३/ २-स दि. २१.५.२०१८
५) सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग शासन परिपत्रक क्रमांक कृकमा ०७१८ / प्र.क्र.११८/ २-स दि.१०.८.२०१८
६) सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग शासन परिपत्रक क्रमांक कृकमा ०६१८ / प्र.क्र.१०६/ २-स दि.३०.६.२०१८, दि.२९.९.२०१८, दि.१९.१२.२०१८, दि.८.३.२०१९ व दि.२५.६.२०१९
७) सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग शासन परिपत्रक क्रमांक कृकमा १०१८ / प्र.क्र.१५५/ २-स दि.१३.२.२०१९
८) वित्त विभाग, शासन परिपत्रक क्र.संकिर्ण २०१६/प्र.क्र.३१/कोषा --प्रशा ५, दि.१०.५.२०१६
९) वित्त विभाग, शासन परिपत्रक क्र. अर्थसं २०१९/प्र.क्र.४४/अर्थ-३, दि.१.४.२०१९
१०) सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग शासन निर्णय क्रमांक अर्थसं ०५१९ / प्र.क्र.७१/२-स दि. १४.५.२०१९ व दि.१५.५.२०१९
११) सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग शासन निर्णय क्रमांक कृकमा ०४१९ / प्र.क्र.६२/२-स दि. १०.६.२०१९

**प्रस्तावना:-**

राज्यामध्ये सन २००९-१० पासून असलेल्या सततच्या दुष्काळ व नापिकीमुळे कर्जबाजारी झालेल्या शेतक-यांना दिलासा देण्यासाठी दि.२४.६.२०१७ च्या मंत्रीमंडळ बैठकीत मिळालेल्या मान्यतेनुसार शासन निर्णय दि. २८.६.२०१७ अन्वये "छत्रपती शिवाजी महाराज शेतकरी सन्मान योजना-२०१७" घोषित करण्यात आलेली आहे. तद्नंतर सदर योजनेचा अधिकाधिक शेतकऱ्यांना लाभ मिळावा या दृष्टीने,वरील "वाचा-" येथे नमूद केलेल्या अ.क्र.१ ते ७ येथील सहकार विभागाच्या शासन निर्णय व शुद्धीपत्रकान्वये वेळोवेळी या योजनेत बदल करण्यात आला आहे.

"छत्रपती शिवाजी महाराज शेतकरी सन्मान योजना-२०१७ (राज्य स्तर) (२४३५ ००८२)" अर्थसहाय्य या योजनेच्या अंमलबजावणीसाठी बाबनिहाय खर्चाकरीता सन २०१९-२० या आर्थिक वर्षातील उपलब्ध तरतुदीमधून संदर्भ क्र.१० येथील सहकार विभागाच्या शासन निर्णय व शुद्धीपत्रकान्वये रु.१३३ कोटी इतका निधी वितरीत करण्यात आलेला आहे. तसेच संदर्भ क्र.११ येथील सहकार विभागाच्या शासन निर्णय व शुद्धीपत्रकान्वये रु.१५२ कोटी इतका निधी वितरीत करण्यात आलेला आहे. छत्रपती शिवाजी महाराज शेतकरी सन्मान योजना-२०१७ (राज्य स्तर) (२४३५ ००८२)" अर्थसहाय्य या योजनेच्या अंमलबजावणीसाठी सन २०१९-२० या आर्थिक वर्षातील उपलब्ध तरतुदीमधून आणखी काही निधी वितरीत करण्याबाबत शासनाने खालीलप्रमाणे निर्णय घेतला आहे.

**<u>शासन निर्णयः-</u>**

सन २०१९-२० या आर्थिक वर्षात सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभागाकडील कार्यक्रम खर्चाच्या योजनेअंतर्गत मंजूर निधीपैकी वितरीत निधी वगळता रु.५७७.७७ कोटी (रू.पाचशे सत्त्याहत्तर कोटी सत्त्याहत्तर लाख फक्त) एवढा निधी छत्रपती शिवाजी महाराज शेतकरी सन्मान योजना-२०१७ राज्यस्तर (२४३५ ००८२) या योजने अंतर्गत ३३- अर्थसहाय्य या बाबीसाठी वितरित करण्यास या शासन निर्णयान्वये शासनाची मान्यता देण्यात येत आहे.

२. सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य कार्यालयाने वित्त विभागाच्या उपरोक्त वाचा क्र.८ व ९ येथील शासन परिपत्रकामधील सूचनांचे पालन करावे. तसेच छत्रपती शिवाजी महाराज शेतकरी सन्मान योजनेअंतर्गत वेळोवेळी प्रसिद्ध झालेल्या पात्र लाभार्थ्यांच्या ग्रीन लीस्ट नुसार निधी खर्च करण्यात यावा.

३. सदर तरतूद खर्च करण्यासाठी सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे अधिनस्त अप्पर आयुक्त व विशेष निबंधक, सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे यांना नियंत्रण अधिकारी म्हणून घोषित करण्यात आले आहे. तसेच लेखाधिकारी, अधिन सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे यांना आहरण व संवितरण अधिकारी म्हणून घोषित करण्यात आले आहे. सदर निधी आहरण करुन हा खर्च वेळेत होईल हे सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे यांनी पहावे. तसेच या बाबतचा अहवाल व खर्चाची माहिती वेळोवेळी शासनास पाठवावी.

४. सदरहू रक्कम मागणी क्रमांक व्ही- २, २४३५-- इतर कृषिविषयक कार्यक्रम, ००, ६० - इतर, १०१ -- शेतक-यांच्या कर्ज माफीसाठी योजना, छत्रपती शिवाजी महाराज शेतकरी सन्मान योजना-२०१७ (राज्य स्तर) (२४३५ ००८२)-३३ अर्थसहाय्य (दत्तमत) या लेखाशीर्षाखालील सन २०१९-२० या वर्षासाठी उपलब्ध असलेल्या तरतूदीमधून खर्च करण्यात यावा.

५. सदर शासन निर्णय नियोजन विभागाच्या सहमतीने व त्यांचे अनौपचारिक संदर्भ क्र.९४/१४३१, दि.१८.७.२०१९ आणि क्र.३९५/१४३१, दि.१८.७.२०१९ तसेच वित्त विभागाच्या सहमतीने व त्यांचे अनौपचारिक संदर्भ क्र.३४५/२०१९/व्यय-२, दि.१९.७.२०१९ आणि क्र.३४४/२०१९/व्यय-२, दि.१९.७.२०१९ अन्वये प्राप्त झालेल्या मान्यतेने निर्गमित करण्यात येत आहे.

६. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २०१९०७३०११२७१०३३०२ असा आहे. हा शासन निर्णय डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Ramesh Shankarrao Shingte

Digitally signed by Ramesh Shankarrao Shingte
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Cooperation, Marketing And Textile Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=fed1b2ed6e1e4aca719170d9eae8aa251ee28dc56c75d8a65acb34103d45bd48, serialNumber=b9bf7a534d8f1272bd902482bf95b556a5baefdddce18574a78fa2d8d0957d1f, cn=Ramesh Shankarrao Shingte
Date: 2019.07.30 11:38:04 +05'30'

**( रमेश शिंगटे )**
**अवर सचिव तथा सहनिबंधक,**
**सहकारी संस्था, महाराष्ट्र शासन**

**प्रत:-**

१. सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे.
२. महालेखाकार, महाराष्ट्र- १, मुंबई.
३. महालेखाकार, महाराष्ट्र- २, नागपूर.
४. विभागीय सहनिबंधक, सहकारी संस्था (सर्व)
५. जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था (सर्व)
६. वित्त विभाग (का.व्यय-२/अर्थसंकल्प -१३), मंत्रालय, मुंबई
७. नियोजन विभाग (का.१४३१), मंत्रालय, मुंबई
८. जिल्हा कोषागार अधिकारी, पुणे.
९. अवर सचिव (कार्यासन १७ स), सहकार पणन व वस्त्रोद्योग विभाग, मंत्रालय मुंबई
१०. निवड नस्ती-२-स.